# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## निर्देश पत्र

विषय: धुळे जिल्ह्यातील उप्परपिंड - २ (ता. शिरपूर) या प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाकरिता दि. ०२/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त

फाईल क्रमांक: ________________

शाखा: ________________

संदर्भ: दि. ०२/०९/२०२० रोजी झालेली पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी

| दिनांक | कोणाकडे पाठविला | टीप व सूचना |
|---|---|---|
| ०३/०९/२०२० | मा. अप्पर जिल्हाधिकारी, धुळे | दि. ०२/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे मराठी व इंग्रजी इतिवृत्त (प्रत्येकी ३ प्रती) मान्यतेसाठी सविनय सादर.<br>Patil 3/9/2020<br>Sub - Regional Officer<br>M.P.C Board, Dhule |

**धुळे जिल्ह्यातील उप्परपिंड - २ (ता. शिरपूर) या प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाकरिता दि. ०२/०९/२०२० रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

धुळे जिल्ह्यातील खालील तक्त्यात नमूद केलेल्या शिरपूर तालुक्यातील प्रस्तावित असलेल्या वाळू घाटाकरिता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. ०२/०९/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

| अ. क्र. | प्रस्तावित वाळू घाटाचे ठिकाण | नदी | लगतचे गट क्र. | तालुका |
|---|---|---|---|---|
| १ | उप्परपिंड - २ | तापी | १०६,१०७,१०८, ११९ व १२४ | शिरपूर |

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२००८२४-FTS-००४२ दि. २४/८/२०२० अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

१) जिल्हादंडाधिकारी, धुळे किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - अध्यक्ष

२) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक - सदस्य

३) उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे - समन्वयक

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील प्रमाणे समिती सदस्य उपस्थित होते.

१) श्री. दिलीप जगदाळे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, धुळे
२) श्री. अमर दुर्गुळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक- (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे)
३) सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे

पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील शासकिय अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी, धुळे.
२) श्री. ललीत वाईकर, कनिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, धुळे.

सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, धुळे तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष, तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक, महसूल विभागाचे अधिकारी, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

धुळे जिल्हयातील उप्परपिंड – २ या वाळू घाटामधून वाळूचा उपसा करण्याकरीता प्रकल्पधारक जिल्हा खनिकर्म अधिकारी, धुळे यांनी दि. २७/०७/२०२० रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, केंद्र शासनाच्या खनिकर्म विभागाने मार्च २०१८ मध्ये Sand Mining Frame Work, 2018 प्रसिध्द केलेले आहे. त्यामध्ये वाळू/रेती निर्गती करताना आवश्यक असणाऱ्या बाबीं संदर्भात देशातील काही ठळक राज्यांचा अभ्यास करुन काही दिशा निर्देशक दिलेले आहेत. तसेच माननीय राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) यांनी ओ.ए.नं. ३६८/२०१५ मध्ये दिनांक १९/०९/२०१८ रोजीच्या आदेशानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याशी समन्वय साधून Sustainable Sand Mining Guidelines, 2016 व Sand Mining Frame Work , २०१८ व २०२० नुसार धोरणात अनुकूल बदल करण्याचे व जनसुनावणी घेण्याचे निर्देश पारित केलेले आहेत.

समन्वयक यांनी असे नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे, हा आहे.

महाराष्ट्र प्रदुषण नियत्रंण मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, धुळे यांच्या मान्यतेनुसार दि. ०२/०९/२०२० रोजी धुळे जिल्हयातील वाळू घाटाबाबत पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आले. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि. ३०/०७/२०२० रोजीच्या मराठी दैनिक लोकमत पान नं. ०२ वर व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये पान नं. ०६ वर सदरच्या लोकसुनावणी बाबतच्या सुचना प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. तसेच अधिसुचनेप्रमाणे वाळू घाटासंबंधीचे ठळक वैशिष्ट असलेल्या व प्रकल्पाबाबत माहिती असलेल्या प्रारुप पर्यावरण व्यवस्थापन अहवालाच्या प्रती मराठी व इंग्रजीत शासनाच्या खालील कार्यालयामध्ये इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे.
२) जिल्हा उद्योग केंद्र, धुळे.
३) जिल्हा परिषद कार्यालय, धुळे .
४) नगर परिषद कार्यालय शिरपूर ता. शिरपूर जि. धुळे
५) तहसिल कार्यालय, शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे.
६) उप-विभागीय कार्यालय, शिरपूर, ता. शिरपूर जि. धुळे.
७) ग्रामपंचायत कार्यालय - उप्परपिंड - २, ता. शिरपूर जि. धुळे.
८) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, फुलचंद प्लाझा, २ रा मजला, देवपूर धुळे.
९) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्र्यंबक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
११) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
१२) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

वैज्ञानिक, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन तथा सचिव, राज्यस्तरीय तज्ञ मूल्यांकन समिती-१ यांनी त्यांच्या पत्र क्र. SEAC/२०१६/प्र. क्र. १/ तां. क. ३ दि. ४/५/२०२० अन्वये सध्या सुरु असलेल्या कोविड-१९ विषाणूच्या उद्रेकामुळे राज्यात शासनातर्फे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे सदरील जाहीर लोकसुनावणी ह्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेण्याबाबत सूचित केले होते.

तद्नंतर धुळे जिल्हयातील उप्परपिंड - २ या वाळू घाटाबाबत श्री. रामकृष्ण (Integrated Precision System and Services Pvt. Ltd. Hyderabad), यांनी प्रकल्पधारकाच्या वतीने प्रकल्पाचे सादरीकरण केले. तसेच वाळू उपसा करतांना प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

लोकसुनावणीचे संयोजक यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्तावीत वाळू घाटाबाबत श्री. देवेंद्र पंडीत पाटील, संस्थापक अध्यक्ष, लोक क्रांती सेना, धुळे यांचे एक लेखी निवेदन प्राप्त झाले असल्याची माहिती दिली.

जनसुनावणीच्या संयोजकांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे प्रस्तवीत वाळू घाटाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. देवेंद्र पंडीत पाटील, संस्थापक अध्यक्ष, लोक क्रांती सेना, धुळे –**<br>सादरीकरणामध्ये दाखवील्याप्रमाणे नदी किनारी वृक्षा रोपन करणे, मजुरांना मास्क देणे ईत्यादी कुठलीही गोष्ट प्रत्यक्षात केली जात नाही असा अनुभव आहे. कोणत्याही नियमांचे पालन न करता वाळूचा उपसा केला जातो. वाळू उत्खनन करीत असताना एखादा मजूर जखमी झाल्यास तेथे प्राथमिक उपचारांची सुध्दा सोय नसते.<br>नियमाप्रमाणे वाळू उत्खनना करीता पोकलेनचा वापर निषिध्द आहे, तरी पण पोकलेनचा वापर सर्रासपणे केला जातो ही वस्तूस्थिती आहे. परवानगी देण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा कितीतरी जास्त वाळूचा उपसा केला जातो.<br>विहीरीच्या आकाराचे मोठे-मोठे खडडे नदी पात्रात तयार होतात. ब-याच वेळेस या खडडयांमध्ये लहान मुले पडण्याच्या दुर्घटना झालेल्या आहेत.<br>कंत्राटदारातर्फे जास्त नफा कमवीण्यासाठी क्षमतेपेक्षा जास्त वाळूची वाहतूक सर्रासपणे केली जाते. ज्यामुळे रस्त्यांची दुर्दशा होते. कंत्राटदार शासकिय अधिकारी व पोलिसांना सुध्दा जुमानत नाहीत. ते उप विभागीय अधिका-यांना सुध्दा धमकावतात.<br>परवानगी देण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा दोन-तीन पट जास्त वाळूचा उपसा केला जातो. यामुळे शासनाचा महसूल बुडतो व कंत्राटदारास मात्र फायदा होतो. | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>तहसिलदार, उप विभागीय अधिकारी व जिल्हा संनियंत्रण समिती यांच्याव्दारे वेळोवेळी पाहणी व देखरेख केली जाईल. सुरक्षेची व नियमपालनाची खबरदारी घेण्यात येईल. काही नियम बाहय बाब आढळल्यास आवश्यक ती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | नदीच्या पाणी असलेल्या भागातून सुध्दा वाळूचा उपसा करण्यात येतो. कंत्राटदारांना अमाप फायदा होत असल्यामुळे बेकायदेशीर कृत्य व गुन्हेगारी यांच्यात वाढ होते.<br>आमच्यासारख्या पर्यावरण प्रेमी कार्यकर्त्यांनी जर वाळू उपसा होत असलेल्या ठिकाणी भेट दिल्यास कंत्राटदाराकडून त्रास दिला जातो.<br>कंत्राटदारास आवश्यक ती कागदपत्रे ईच्छूक व्यक्तीस दाखवणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.<br>वाळू हा नदीचा आत्मा आहे व वाळू मुळेच नदीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. अतिरीक्त वाळूचा उपसा केल्यामुळे सभोवतालच्या क्षेत्रातील पाण्याची पातळी कमी होते. याचा परिणाम शेतीवर पण होतो.<br>आमचा वाळू उत्खनन करण्याबाबत आक्षेप नसून नियमांचे पालन होणे आवश्यक आहे. आमचा विरोध हेतूपुरस्सर नसुन पर्यावरणाचे संवर्धन व जतन होणे हा आमचा हेतू आहे. सर्व नियमांचे पालन केले जाईल अशी आम्ही अपेक्षा करतो. | |
| २ | **श्री. बी. एन. बीरारी, (धुळे) –**<br>धुळे जिल्हयातील वाळू मुंबई, पुणे व नाशिक या जिल्हयामध्ये पाठविण्यात येते, हे थांबले पाहीजे. अमर्यादपणे वाळूचा उपसा केल्यामुळे पर्यावरणाचे अतोनात नुकसान होत आहे. पाण्याची पातळी खालावत आहे, शेतीवर विपरीत परिणाम होत आहे.<br>कंत्राटदार प्रामाणीकपणे काम करीत नाहीत. वाळू घाटांची लिलाव प्रक्रिया थांबविण्याची आमची विनंती आहे.<br>वाळूची आंतर जिल्हा वाहतूक बंद करण्यात यावी. ब-याच वेळेस ५० किलोच्या बॅग मध्ये व कंटेनर मध्ये सुध्दा वाळूची तस्करी केली जाते. | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>तहसिलदार, उप विभागीय अधिकारी व जिल्हा संनियंत्रण समिती यांच्याव्दारे वेळोवेळी पाहणी व देखरेख केली जाईल. काही नियम बाहय बाब आढळल्यास आवश्यक ती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली जाईल. |
| ३ | **श्री. विशाल बोरसे –**<br>वाळू उत्खननामुळे भुजलावर विपरीत परिणाम होऊ नये या करीता कोणत्या उपाययोजना प्रस्तावित आहेत ? | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>वाळू घाटांची निश्चिती करताना भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांच्याव्दारे वाळूच्या थराची पातळी निश्चित केली जाते व त्या पातळीपर्यंतच वाळूचा उपसा करण्याची परवानगी देण्यात येते.<br>**श्री. ललीत वाईकर, कनिष्ठ भुवैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा –**<br>वाळू घाटांना मान्यता देण्यापूर्वी उपलब्ध असलेल्या वाळूसाठयापैकी भुजलाच्या पातळीस/ साठयास नुकसान न पोहचेल ईथपर्यंतच्या वाळूच्या थराची पातळी निश्चित केली जाते व त्या पातळीपर्यंतच वाळूचा उपसा करण्याची परवानगी देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| ४ | **श्री. दिनेश देवरे (शिरपूर) –**<br>वाळू उत्खननासाठीची जागा कशी निश्चित करण्यात येते? | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>महसूल, भुजल, जलसंपदा, प्रदुषण नियत्रण मंडळ, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय या क्षेत्रातील तज्ञांच्या तालुका तांत्रीक समितीव्दारे महत्वाचे मुद्दे जसे की, रस्त्यापासूनचे अंतर, पुलापासूनचे अंतर व गावापासूनचे अंतर ई. विचारात घेवून वाळू घाटाची जागा निश्चित करण्यात येते. |
| ५ | **श्री. मनीष नीकम –**<br>वाळू उत्खननासाठीची नियोजित वेळ काय असेल? | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>वाळू उत्खनन सकाळी ६.00 ते संध्याकाळी ६.00 या दरम्यानच केली जाईल. |
| ६ | **श्री. नागराज महादू पाटील – सरपंच उप्परपिंड ता. शिरपूर**<br>वाळू लिलावातून ग्रामपंचायतीस निधी उपलब्ध करून दिला जाईल का?<br>मागील निधी अजून मिळाला नाही. | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>वाळू लिलावातून ग्रामपंचायतीस निधी देण्याची तरतूद आहे.<br>मागील निधी उपलब्ध करून देण्याची प्रक्रीया सुरू असून निधी लवकरच प्रदान करण्यात येईल. |
| ७ | **श्री. विकास पाटील –**<br>वाळू उत्खनन होत असलेल्या क्षेत्राची अनुपालन तपासणी व देखरेख कशाप्रकारे केली जाईल? | **श्री. किशोर घोडके, जिल्हा खनिकर्म अधिकारी –**<br>वाळू उत्खनन होत असलेल्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यात येईल व याव्दारे नियमीत देखरेख केली जाईल.<br>तसेच या शिवाय संबंधित अधिकारी नियमीतपणे भेट देऊन पाहणी करतील. |

लोकसुनावणीच्या संयोजक सौ. सौजन्या सु. पाटील, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ धुळे व लोकसुनावणीचे अध्यक्ष श्री. दिलीप जगदाळे, अतिरीक्त जिल्हाधिकारी यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

सौ. सौजन्या सु. पाटील यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

| (सौजन्या सु. पाटील) | (अमर दुर्गुळे) | (दिलीप जगदाळे) |
|---|---|---|
| समन्वयक<br>तथा<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>धुळे | सदस्य<br>तथा<br>प्रादेशिक अधिकारी<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>नाशिक | अध्यक्ष<br>तथा<br>अतिरिक्त जिल्हाधिकारी,<br>धुळे |